माज.

क्रूस तुम्हीं सांभाळा

मुद्रित ३८ ५१७५४



नुसते
सूर्य डोळ्यात साठवून,
चंद्र ओंजळीत घेवून—
रस्ते सापडणार नाहीत (भळसळार)
कारण
सगळे रस्तेच
~~कण~~ क्रूस झाले आहेत.
प्रत्येकाच्या अस्तित्वाचा झगडा
डबक बनून
स्वर्गलोकीचं
नागळ देवपण—
कल्पनेच्या तळपालिकडील
शिलालेख झालं आहे.
तुम्हाला आमचा सहवास हवा आहे
तर—
आमची शिल्प उभारा
दारातील तुळशीवृंदावनासारखी
आमचीहि पूजा करा.
आज
~~आमच्याच~~
येशूच्या प्रत्येक डोळ्यात
केवळ आमच्याच प्रतिमा दिसतील

अशी अक्षरं अक्षरं
आम्ही निर्माण केली आहेत.
ज्यांच्या संघटनेतून
आम्ही इतिहास बदलणार आहोत.
(तुमच्या आचारात (दृष्टीकोनात)
आम्ही येशू आलो तर काय बिघडलं?
नाहीतरी—
तोही म्हणायचाच,
मीच धर्म ~~आहे~~ मीच सत्य, मीच मार्ग आहे.
(मुखानेच)—
मलाही तेच म्हणायचंय.
मी तुमचा ~~कफल्लक~~ रस्ता असलो तरी
तुमचाच आहे
आणि म्हणूनच
डोळ्यांत सूर्य साठवून—
चंद्र ओंजळीत घेऊन
मी निघालो आहे
तुम्ही थोडं सबुरीनं घ्या.
माझ्या परतीच्या वाटेवर
तुमची थकगी जरूर बांधीन.
निदान
माझ्या आडोशाला तरी

तुमच्या अस्तित्वाला जागा आहे.

कारण

माझ्यातच येशू आहे.

पण

क्रूस, मात्र तुम्ही सांभाळा

२८/११/८०